# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:28.03.2026** **वारः शनिवार**

---

1. पश्चिम आशियातील संघर्षाच्या काळात केंद्र आणि राज्यातील समन्वय आवश्यक; टीम इंडिया म्हणून काम करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन
2. पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर 10 रुपये कपात
3. जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधांनी सज्ज महाराष्ट्र निर्माण करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन आणि
4. बृहन्मुंबई वगळता राज्यात अन्यत्र जानेवारी 2011 पर्यंत झालेली सरकारी जमिनीवरची निवासी अतिक्रमणं नियमित होणार

**<u>पंतप्रधान-मुख्यमंत्री</u>**

पश्चिम आशियातील संघर्षाच्या काळात देशाची आर्थिक गती कायम ठेवणं, ऊर्जा सुरक्षा सुनिश्चीत करणं, उद्योग आणि पुरवठा साखळी मजबूत करणं आणि त्याचवेळी सामान्य नागरिकांच्या हिताचं रक्षण करण्याला सरकारचं प्राधान्य आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पश्चिम आशियातील सध्याची तणावग्रस्त परिस्थिती आणि भारतावर होणाऱ्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी देशातील विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांशी काल दूरस्थ माध्यमातून संवाद साधला. यावेळी राज्यांच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. संघर्षग्रस्त भागात सातत्यानं वेगवान घडामोडी घडत आहेत, त्यावर बारकाईनं देखरेख ठेऊन आवश्यक धोरणं तयार करण्याची आवश्यकता आहे; यासाठी तीन मार्चपासून एक आंतर-मंत्रालयीन गट कार्यरत असून, तो दररोज परिस्थितीचा आढावा घेत वेळेवर निर्णय घेत असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. कोविडच्या जागतिक संकटाला तोंड देताना, केंद्र आणि राज्यांचं परस्पर सहकार्य आणि समन्वय, ही भारताची मोठी ताकद ठरली होती, त्याच पद्धतीनं सध्याच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी 'टीम इंडिया' म्हणून एकत्र काम करून आपण या परिस्थितीवर यशस्वीपणे मात करू, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या संकटकाळात महाराष्ट्रात पीएनजी म्हणजेच पाईप्ड नॅचरलं गॅस वितरणाला गती देण्यात येत असून खतांच्या उपलब्धतेसाठी सातत्यानं आढावा घेतला जात असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. ज्या राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत, त्या राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित नव्हते, कॅबिनेट सचिवालय त्या राज्यांच्या मुख्य सचिवांची स्वतंत्र बैठक घेणार आहे.

**<u>पेट्रोल-डिझेल-मुख्यमंत्री</u>**

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, इंधनाचे दर आटोक्यात ठेवण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारनं पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर 10 रुपये कपात केली आहे. त्यामुळं पेट्रोलवरचं प्रतिलीटर 13 रुपये उत्पादन शुल्क 3 रुपयांवर आलं आहे, तर डिझेलवरचं प्रतिलीटर 10 रुपये उत्पादन शुल्क पूर्णपणे काढून टाकण्यात आलं आहे. यामुळं पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होतील अशी अपेक्षा आहे. राज्यं आणि केंद्रशासित

प्रदेशांना व्यावसायिक एलपीजीचं वाटप 50 टक्क्यावरून 70 टक्क्यापर्यंत वाढवायचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. हा अतिरिक्त एलपीजी प्राधान्यानं पोलाद, ऑटोमोबाईल, वस्त्रोद्योग, रसायनं आणि प्लॅस्टिक उद्योगांना पुरवला जाईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<u>मुख्यमंत्री</u>**

देशात लॉकडाऊन लागणार नाही हे, केंद्र सरकारनं जाहीर केलेलं आहे. त्यामुळं यासंदर्भातली खोटी माहिती फेसबुक, एक्स किंवा कुठल्याही समाज मध्यमावर टाकल्यास किंवा फॉरवर्ड केल्यास फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. देशात पेट्रोल, डिझेल तसंच घरगुती गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असल्यानं नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून अनावश्यक साठेबाजी करू नये, किंवा पंपांवर गर्दी करू नये, असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

**<u>भोंदूबाबा खरात</u>**

भोंदू अशोक खरात प्रकरणात अतिशय सखोल चौकशी सुरू असून, आर्थिक फसवणुकीचे प्रकारही उघड झाले आहेत. लवकरच तसे गुन्हे नोंदवले जातील असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. या प्रकरणातल्या पीडीत महिलांच्या गोपनीयतेचं संरक्षण केलं जात असल्यानं अन्य पीडित महिलाही तक्रारींसाठी पुढे येत आहेत. मात्र, काही लोक गोपनीयतेचा भंग करण्याच्या प्रयत्नात असून त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**<u>मन की बात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या मन की बात या कार्यक्रमातून देश आणि परदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 132 वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन तसंच NewsOnAir या मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल. आकाशवाणीवरील हिंदी प्रक्षेपणानंतर लगेचच हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करण्यात येईल.

**<u>पल्स वैद्यकीय परिषद</u>**

राज्यातली आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, बळकट करण्यासाठी शासन आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून काम करत आहे. यातूनच जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा असलेला संपन्न महाराष्ट्र निर्माण करण्याचा मानस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पल्स् वैद्यकीय परिषदेनिमित्त, भारत अमेरिका धोरणात्मक भागीदारी मंचांच्या वतीनं आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. आरोग्य, औषध निर्माण क्षेत्रातल्या कंपन्यांनी शासनासोबत भागीदारी करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत काल दोन दिवसांच्या 'पल्स वैद्यकीय परिषदे'च उद्घाटन झालं. ही परिषद शिक्षण, कौशल्यविकास, आरोग्य नवकल्पना आणि आधुनिक वैद्यकीय प्रणाली यांना एकत्र आणणारा प्रभावी मंच ठरत असल्याचं फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. उद्घाटनप्रसंगी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या.

**<u>अतिक्रमित घर</u>**

महाराष्ट्रातल्या गरीब आणि गरजू कुटुंबांना घरं देण्यासाठी राज्य सरकारनं महत्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार, बृहन्मुंबई वगळता राज्यात अन्यत्र एक जानेवारी 2011 पर्यंत झालेली आणि सध्या अस्तित्वात

असलेली सरकारी जमिनीवरील निवासी अतिक्रमणं नियमीत केली जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा घेतला निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील अर्ज 31 डिसेंबरपर्यंत स्वीकारले जाणार असून, याबाबत महसूल विभागाचा शासन निर्णय जारी झाला आहे.

**<u>ऊस गाळप</u>**

राज्यातला ऊस गाळप हंगाम अंतिम टप्प्यात आला असून, 210 पैकी 183 साखर कारखाने बंद झाले आहेत. राज्यात आतापर्यंत 98 लाख टन साखरेचं उत्पादन झालं असून, सर्वाधिक 23 लाख टन उत्पादन कोल्हापूर विभागात झालं आहे. पुणे विभागात 22 लाख आणि सोलापूर विभागात 18 लाख टन साखरेचं उत्पादन झाल्याची माहिती साखर आयुक्त कार्यालयाकडून देण्यात आली. राज्यातला गाळप हंगाम पुढील 15 दिवसांत संपण्याची शक्यता असल्याची माहितीही साखर आयुक्तालयानं दिली.

**<u>डिजिटल शेतीशाळा-अमरावती</u>**

मागील काही वर्षांत हवामानातल्या बदलामुळं निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतीला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली जाणार आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाअंतर्गत, अमरावती जिल्ह्यासह राज्यातल्या 21 जिल्ह्यांमध्ये 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून एप्रिल महिन्यात विशेष 'डिजिटल शेतीशाळा' आयोजित करण्यात आल्या असून त्यामध्ये तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना शास्त्रोक्त मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

**<u>हवामान</u>**

विदर्भात काल कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भ वगळता उर्वरित राज्यात उद्या हवामान कोरडं राहील. विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान विभागांनं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार..